कॉलेज रोडवर पिस्तुलाचा थरार ; पण छऱ्याच्या ! (पान ३ वर)




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३३०, बुधवार २५ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## पाण्याच्या प्रश्नावर तहसीलसमोर उपोषण सुरु

### भूमिपुत्र शेतकरी संघटनेची पाणी प्रश्नावर भूमिका

पारनेर : प्रतिनिधी

**तालुक्याच्या पाणी प्रश्नावर यापूर्वी वेळोवेळी मागण्या करूनही कोणतीच कारवाई न झाल्यामुळे पारनेर येथे महाराष्ट्र भूमिपुत्र शेतकरी संघटनेने तालुक्याचा जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न सुटावा यासाठी उपोषणाच्या हत्यार उपासले आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर आपल्या सहकाऱ्यांसह पारनेर तहसीलवर मंगळवार दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता उपोषणाला बसले आहेत.**

पश्चिम वाहिन्यांचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी वळवून नगर जिल्हयातील दुष्काळी भगाला देण्यात यावे, कान्हूरपठार, पुणेवाडी, जातेगांव, राळेगणसिध्दी, शहाजापुर उपसा सिंचन योजनेला मान्यता देऊन कार्यान्वीन कराव्यात, डिंबे माणिकडोह बोगद्याचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे, अटी, शर्ती न लावता शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती द्या, नियमित कर्जदारांना प्रोत्साहनपर देण्यात येणारे ५० हजारांचे अनुदान ठराविक शेतकऱ्याऱ्यांना मिळाले, उर्वरीत शेतकऱ्यांना ते मिळावे. यासंबंधीच्या मागण्या भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या आहेत.

पारनेर येथे भूमिपुत्र शेतकरी संघटनेने उपोषण सुरू केले यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर अशोक आंधळे अविनाश देशमुख, सुभाष करंजुले भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष मनोज तामखडे, अरुण बेलकर, संतोष राम वाडेकर,प्रविण खोडदे,अन्सार पटेल, अनिल सोबले, संतोष वाबळे, अब्बास इनामदार, एस एल ढुबे सर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंत शिंदे, नंदू साळवे, रघुनाथ मांडगे, बाळासाहेब वाळूंज,दादू जांभळकर, निवृत्ती कासुटे, संजय भोर, वसंत साठे,पोपट दरेकर, दत्तात्रय फटांगरे, बाबासाहेब वाडेकर,शिवाजी तांबे, भावेश गायकवाड, वैभव साळवे, अजित साळवे, आदी कार्यकर्ते पाणी प्रश्न संदर्भात पारनेर तहसील कार्यालयावर उपोषणाला बसले आहेत.




**पारनेर तालुक्याच्या एकटीएमसी पाण्याचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे या प्रश्नावर तालुक्यात राजकारण केले जाते परंतु कोणीही लोकप्रतिनिधी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही दुष्काळी पारनेर तालुक्याचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे या प्रमुख मागणीसाठी आम्ही भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने पारनेर तहसीलवर आमरण उपोषणाला बसलो आहे.**

**संतोष वाडेकर**
अध्यक्ष : भूमिपुत्र शेतकरी संघटना

**पारनेरच्या पठार भागाचा पाणी प्रश्न अनेक दिवसापासून भिजत पडला आहे. कान्हूर पठार येथे झालेल्या एका कार्यक्रमात तत्कालीन व सध्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच पारनेरला पश्चिम पट्ट्यातील पाणी बंद पाईपद्वारे मिळवून दिल्याशिवाय तालुक्यात मत मागायला येणार नाही असे जाहीर सभेमध्ये सांगितले होते. त्यांनी त्यांचा शब्द पाळला नाही आम्ही पारनेरकर ५० वर्षापासून पाण्याच्या प्रश्नावर संघर्ष करत आहे.**

**वसंत शिंदे**
पठार भागावरील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते

## उपनिरीक्षक व पोलीस भरतीची कार्यवाही करा

### खा. नीलेश लंके यांची देवेंद्र फडणवीसांकडे मागणी

नगर : प्रतिनिधी



**महाराष्ट्र पोलीस दलात रिक्त असलेली पोलीस शिपायांची १८ हजार ५०० पदांची भरती प्रक्रिया तसेच पोलीस निरीक्षक पदांच्या भरतीसाठीचे मागणीपत्र राज्य लोकसेवा आयोगाकडे आचारसंहितेपुर्वी पाठविण्यात यावे अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दोन स्वतंत्र पत्राद्वारे केली आहे.**

पोलीस शिपायांच्या १८ हजार ५०० पदांच्या भरतीसंदर्भात पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील लाखो तरूण-तरूणी महाराष्ट्र पोलीस दलात भरती होऊन सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहेत. त्यासाठी रात्रंदिवस मेहनत करून तयारी करत आहेत. आज रोजी गृहविभागाकडे पोलीस शिपायांची अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी विधानसभा निवडणूकीच्या आचारसंहितेपूर्वी जाहिरात प्रसिध्द करावी यासाठी परीक्षार्थी विद्यार्थी आपणाकडे तसेच संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करत असल्याकडेही खा. लंके यांनी लक्ष वेधले आहे.

पोलीस उपनिरीक्षक पदाच्या भरतीबाबत फडणवीस यांना पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या १८ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार महाराष्ट्र अराजपत्रीत गट व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ची जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी सुधारीत मागणीपत्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आलेले नाही. त्यामुळे ही जाहिरात प्रसिध्द होउ शकत नाही. त्यातच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता तोंडावर आली आहे. त्यामुळे सर्व स्पर्धा परीक्षार्थींनी आपणाकडे व सबंधित विभागाकडे वारंवार मागणी केलेली आहे. जाहिरात लवकर प्रसिध्द न झाल्यास स्पर्धा परीक्षांचा अभ्यास व सराव करणाऱ्या उमेदवारांचे वय वाढल्याने त्यांच्यावर अन्याय होणार असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे.

**वाढीव वयोमर्यादेचा फायदा व्हावा**

**दि.३ मार्च २०२३ रोजी सामान्य प्रशासन विभागाने पोलीस शिपाई पदासाठी २ वर्षे कमाल वयोमर्यादा वाढवून दिली आहे. त्या अनुषंगाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी भरती प्रक्रियेची जाहिरात प्रसिध्द झाल्यास अनेक परीक्षार्थीना त्याचा फायदा होईल असेही खा. लंके यांनी पत्रात नमुद केले आहे.**

**वयाधिकांसाठी सहा महिने वय वाढवून द्या**

**महाराष्ट अराजपत्रीत गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ची जाहिरातीस सहा महिने उशिर झाल्याने या पदांसाठीची जाहिरात प्रसिध्द करून वयाधिक उमेदवारांना वयामध्ये सहा महिन्यांची वाढ देण्यात यावी अशी मागणीही खा. लंके यांनी केली आहे.**

## अतिवृष्टीमुळे झालेल्या पीकांच्या नुकसानीचे पंचनामे करा

### खासदार नीलेश लंके यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर : प्रतिनिधी



**गेल्या दोन दिवसांपासून नगर दक्षिण मतदारसंघातील विविध गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त पीकांचे तातडीने पंचनामे करून त्याचा अहवाल सादर करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे केली आहे.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दोन दिवसांपासून संततधार तसेच अतिवृष्टी झाल्याने शेतक-यांच्या उभ्या शेतपीकांचे आतोनात नुकसान झाले आहे. विशेषतः सोयाबीन, मुग, कांदा, भुईमुग व इतर पीकांचा नुकसानीमध्ये समावेश आहे. कान्हूरपठार येथील शेतक-यांच्या सोयाबीन पीकाचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून त्याचेही पंचनामे करण्यात यावेत या मागणीसोबतच नगर दक्षिण मतदारसंघातील ज्या ज्या गावांमध्ये पीकांचे नुकसान झाले आहे त्या गावांतील नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी लंके यांनी केली आहे.

या पत्राच्या प्रती नगर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, शेवगांव, पाथर्डी, राहुरी व पारनेरच्या तहसिलदारांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## काळू धरण ओव्हर फ्लो ! शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण


### ढवळपुरीसह भाळवणीचा पाणीप्रश्न सुटणार

ढवळपुरी : प्रतिनिधी

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी परीसराला वरदान ठरलेला काळू नदीवरील काळू प्रकल्प कालच्या (सोमवारी) पावसात तुडुंब भरला आहे. या प्रकल्पामुळे ढवळपुरी परीसर सुजलाम सुफलाम झाला आहे.

या परिसरातील पाच गावांची पाणी योजना याच प्रकल्पावर आहे. या परीसरातील सुमार एक हजार हेक्टरहून अधिक शेतीसाठी या लघु पाटबंधारेमधून शेतीसाठी सिंचन योजना राबविण्यात आल्या आहेत. या परीसराला आता किमान दोन वर्ष हे पाणी पुरणार आहे.

ढवळपुरी परिसराला वरदान ठरलेला काळू नदीवरील लघु पाटबंधारे विभागाचा हा तलाव आहे. तो काळू प्रकल्प म्हणूनच ओळखला जातो. अतिशय अडचणीतून व मोठ्या कष्टाने हा प्रकल्पाचे काम माजी आमदार (कै.) वसंतराव झावरे यांच्या काळात सुरू झाले. मात्र, अनेक अडथळे सातत्याने येत राहिले. शेवटी हे काम माजी आमदार व विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांच्या काळात पुर्णत्वास गेले.या धरणाच्या मंजूरीपासूनच त्याला अनेक अडथळे येत होते. त्या मुळे याचे काम सुमारे पाच वर्षापेक्षा अधिक काळ सुरू होते. शेवटी या धरणाच्या खर्चाचे बजेटसुद्धा वाढवावे लागले. ते काम औटी यांच्या प्रयत्नातून झाले.



काळु धरणाचे काम शेवटी २०१० साली पुर्ण झाले. तेव्हापासून सुमारे पाच ते सहा वेळा हे धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे.हे धरण एकदा भरल्यानंतर किमान या परीसराला दोन वर्षासाठी तरी पाण्याची टंचाई भासत नाही. या धरणामुळे या परीसरातील सुमारे एक हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. या धरणावर अनेक शेतकऱ्यांच्या खाजगी वैयक्तिक उपसा जलसिंचन योजना आहेत. त्यातून या परिससरातील एक हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र ओलिताखाली आले आहे.

या धरणावर ढवळपुरी, भाळवणी, धोत्रे या तीन गावांसह हिवरे कोरडा,गोरेगाव, पाडळी, काळकूप व माळकूप या गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना आहेत. त्यामुळे हे धरण भरल्यानंतर सलग दोन वर्ष या गावांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या मिटते. उर्वरीत पान ३ वर

## भाजपाची उमेदवारी निष्ठावंतालाच !

### विश्वनाथ कोरडे यांचा ठाम विश्वास । जवळे येथे विविध विकास कामांचा शुभारंभ



जवळे : प्रतिनिधी

**गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून पक्ष वाढीसाठी प्रतिकुल परिस्थितीत आपण घेतलेली मेहनत लक्षात घेऊन आगामी विधानसभा निवडणूकीत भाजपाचे पक्षश्रेष्ठी निष्टावान म्हणून आपल्याच नावाचा विचार करतील असा विश्वास व्यक्त करतानाच तालुक्यात भाजपा उमेदवारीबाबत इतरांच्या नावांच्या ज्या चर्चा सुरू आहेत, त्यामुळे नाउमेद न होता त्या चर्चांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केले.**

जवळे येथील ३६ लाख १४ हजार रूपये खर्चाच्या विविध विकास कामांचा शुभारंभ कोरडे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कोरडे म्हणाले, लोकशाही व्यवस्थेत ज्याची इच्छा आहे त्यास उमेदवारी मागण्याचा अधिकार असतो. त्यात चुकीचे काहीही नाही. मात्र उमेदवारी निश्चित करताना कोणाची निवड करावी याचाही निश्चित विचार झाला पाहिजे. भाजपा हा बुध्दीवंतांचा पक्ष आहे. त्यामुळे पक्षाकडून उमेदवार निवडताना कोणतीही चुक होणार नाही याची मला खात्री आहे.

राजकारणात निर्णायक वेळ सातत्याने येत असतात. त्यामुळे विचार न करता जनतेचे प्रश्न सोडवत राहणे हे आदर्श नेतृत्वाचे लक्षण आहे. आणि जनहिताच्या मार्गाने वाटचाल करत राहणे हेच मला सध्याच्या काळात योग्य वाटते असे कोरडे म्हणाले.

यावेळी भाजपाचे उर्वरीत पान ३ वर

## नगर शहरातील सीना नदीला पूर

### नगर-कल्याण महामार्गावरील वाहतूक ठप्प



नगर : प्रतिनिधी

**सोमवारी रात्री सीना पाणलोटात झालेल्या दमदार पावसामुळे सीना नदी दुधडी भरुन वाहून वाहू लागली. नदीवरील कठड्यापर्यत पाणी आल्याने नगर-कल्याण महामार्गावरील वाहतुक पाच तास ठप्प झाली होती. ही वाहतूक केडगाव, भूषणनगर मार्गे वळविण्यात आली होती.**

नगर शहर व तालुक्यात सोमवारी दिवसभर ढगाळ व उष्ण वातावरण निर्माण झाले होते.त्यानंतर सायंकाळनंतर विविध भागात विजांच्या कडकडाटात जोरदार पावसाला सुरूवात झाली. नगर शहर व तालुक्यात पावसाची जोरदार उर्वरीत पान ३ वर



# प्रगतीमंत्र

## हवा फक्त आत्मविश्वास !

**क्षितिज, एक अत्यंत हुशार आणि आकर्षक असा विशीतील तरूण. असा हा बुद्धिमान तरुण रिटेल क्षेत्रात टीम लीडर म्हणून काम करतो. सविस्तर चर्चा, वादविवादात येणारे अडथळे आणि मनाचा गोंधळ यामुळे क्षितिज समुपदेशन सत्रात सहभागी होण्याचा निर्णय घेतो. एक मनोचिकित्सक आपल्या कामाशी संबंधित समस्या सोडवण्यात मदत करू शकतो, याबाबत त्याच्या मनात शंका मात्र होतीच...**



क्षितिज मनोचिकित्सकाशी संवाद साधण्यास सुरुवात करतो. तो म्हणतो, 'मी नेहमीच गोंधळलेला असतो. कोणतेही काम आत्मविश्वासपूर्वक सुरू करण्यासाठी मला फारच वेळ घ्यावा लागतो. असा माझा अनुभव आहे. मी एखादे काम करू शकतो आणि ते माझ्या आवाक्यातही आहे, याची जाणीव मला नक्कीच असते, मात्र त्या कामाचा परिणाम अपेक्षेप्रमाणे मला कधीही साधता येत नाही. चिंता, काळजी आणि अनिश्चिततेमुळे माझ्यावर परिणाम होतो. परंतु, जेव्हा मी काम हाती घेतो तेव्हा मी माझी सर्व ताकद एकवटून ते करत असतो. माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवर माझी काही उद्दिष्ट्ये आहेत, पण ती पूर्णत्वास नेताना मला बराच विलंब होतो. हाती घेतलेल्या कामात प्रगतीसाठी आवश्यक असलेली निश्चित दिशा ठरवण्याची कुवत माझ्यात नाही किंवा भूतकाळात मला आलेल्या निराशाजनक अनुभवांमुळे हे होत असावे असे वाटते.' क्षितिजचे ध्येय काय आहे, त्याची रोजनिशी कशी आहे, त्याच्या आकांक्षा काय आहेत, तो प्रयत्न कशा प्रकारे करतो, त्याची विचार प्रक्रिया कशी चालते, हे जाणून घेतल्यानंतर अनेक गोष्टींचा उलगडा होत गेला. तो नेहमीच आपले नवे काम सुरू करताना स्वतःला नकारात्मक प्रश्न विचारत राहतो, शंका उपस्थित करत रहातो हे लक्षात आले. मग त्याच प्रकारचे काम त्याने पूर्वी यशस्वीपणे केलेले असले तरी देखील त्याच्यात नवे काम सुरू करताना आत्मविश्वास नसतो हे लक्षात आले. हाती घेतलेल्या कामाबाबत त्याच्याकडे पुरेशी माहिती, तसेच ज्ञान असते. मात्र तरीही शंका, गोंधळ निर्माण होतो. त्याच्यात आत्मविश्वासाचा अभाव असतो आणि याच कारणांमुळे त्याची कामे पूर्णत्वास जात नाहीत किंवा विलंब लागतो असे दिसून आले.

### आत्मविश्वासावर असा होत होता परिणाम...

अपेक्षित यशाचे कल्पनाचित्र जरूर रंगवतोय, मात्र आपल्यापुढील आव्हाने कोणती आहेत आणि प्रक्रियेचा भाग म्हणून ती उभी राहणारच आहेत या विचारांचा क्षितिजमध्ये अभाव आहे. त्याच्या या दृष्टिकोनामुळे त्याचे कल्पनाचित्र अपुरेही पडत होते आणि यामुळे तो आपला आत्मविश्वासही गमावत होता. आपल्यासमोरील आव्हाने पेलण्यात आणि अनिश्चित स्थितीला सामोरे जाण्यात आपण कमी पडत असल्याचे त्याने मान्य केले. पुढे छोटी छोटी कामे हाती घेऊन ती रणनीतीद्वारे पूर्णत्वास नेण्यावर भर देण्यात आला. यामुळे यश आणि अपयशामधील दरी भरून निघण्यास मदत झाली. यानंतर मग हळूहळू मोठी कामे हाती घेण्यात आली. योग्य त्या प्रयत्नांनंतर तो पुढे निर्माण होणाऱ्या समस्यांचा अंदाज घेणे, योजना आखणे, कार्य व्यवस्थापन अशी कौशल्ये विकसित करण्यात यशस्वी झाला. या प्रक्रियेद्वारे त्याने आत्मविश्वास मिळवला आणि समग्र दृष्टिकोनातून परिस्थितीकडे पाहून आकलन करण्याची क्षमता प्राप्त केली. पुढे त्याच्यात रोजचे निर्णय घेण्याची, तसेच मोठे निर्णय घेण्याआधी फायद्यातोट्याच्या दृष्टीने त्या-त्या निर्णयांचे विश्लेषण करण्याची क्षमताही निर्माण झाली. आत्मविश्वास हा एक परिवर्तनशील असा घटक आहे, जो कामाच्या स्वरूपानुसार तसेच त्या-त्या परिस्थितीनुसार बदलत असतो याचे गमकही त्याच्या लक्षात आले.

#### क्षितिज नेमका कशा प्रकारे विचार करत होता...

- मी निश्चित केलेल्या मानकांनुसार काम करू शकेन का?
- मला यश मिळू शकेल का आणि इतर सहकारी माझ्या कामाची दखल घेत प्रशंसा करतील का?
- हे काम पूर्णत्वास नेण्याची क्षमता माझ्यात आहे का?
- मी कामात अपयशी ठरलो तर लोक माझी टर तर उडवणार नाहीत ना?

## आत्मविश्वास वाढण्यासाठी टाळा या चुका!

**आत्मविश्वास आपल्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वपूर्ण पैलू असतो. तो डळमळला की पुढची सगळी गणितं चुकतात. त्यामुळे आत्मविश्वास कमी होईल अशा गोष्टी करणं टाळलं पाहिजे किंवा सवयी बदलल्या पाहिजेत. आपण अनेक कौशल्यांमध्ये निपुण आहोत म्हणजे इतरांपेक्षा वरचढ आहोत अशीही अनेकांची गैरसमजूत असते. त्यामुळे अशा व्यक्ती लगेच हुरळून जातात. काही व्यक्ती ध्येयपूर्तीनं इतके झपाटलेले असतात की, प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करतात. यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो आणि ध्येयपूर्तीला वेग मिळतो. आत्मविश्वास कमी करणाऱ्या गोष्टी कोणत्या आहेत आणि त्या करणं कसं टाळता येऊ शकतं याविषयी...**




### अति विचार करणं

कोणत्याही गोष्टीचा अति विचार करणं मानसिक आरोग्याच्या दृष्टीनं घातकच असतं. तसंच यामुळे आत्मविश्वासही कमी होतो. मानसिकरित्या सुदृढ असलेले लोक कधीच जास्त विचार करण्यात ऊर्जा वाया घालवत नाहीत. उलट ज्या विचारांनी त्यांचा फायदा होईल ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करतात. कित्येकदा जोखीम पत्करावी लागते. अशा वेळी योग्य विचार करणाऱ्या व्यक्ती यशस्वी ठरतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो.

### जर-तरमध्ये अडकणं...

जर असं असतं तर मी असं केलं असतं. जर मला अमुक एक गोष्ट मिळाली असती तर मी तसं केलं असतं, यामध्ये अनेक जण अडकलेले असतात. सतत याचा विचार करण्यात वेळ वाया घालवतात. यामुळे आत्मविश्वास कमी होतोच शिवाय आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होतो. कदाचित पालकांनी आपल्याला अजून चांगली वागणूक दिली असती, मालकानं आपल्याला जास्त काम करायला लावले नसते, असा विचार करण्यात वेळ घालवणं चुकीचं आहे. त्यापेक्षा हातात असलेल्या वेळेत कामं करुन मोकळं झालं पाहिजे. तसंच जर-तरचा विचार करत बसल्यानं वस्तुस्थिती बदलत नाही. उलट वेळ आणि ऊर्जा वाया जाते. म्हणून आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करुन पुढे मार्गक्रमण केलं पाहिजे.

### काय विचार करतात ?



सहकारी, मित्र- मैत्रिणी किंवा ओळखीतली मंडळी आपल्याबद्दल काय विचार करतात याची कित्येकांना काळजी वाटते. याचा सतत विचार केला तर चांगल्या गोष्टी करण्यापासून मागे राहतो. एखादी व्यक्ती आपल्याबद्दल अमुक प्रकारे विचार करते याची काळजी करत बसलो तर आत्मविश्वास कमी होतो. यामुळे टीका किंवा नकार पत्करावा लागतो. उदाहरणार्थ, तुम्ही एखाद्या कंपनीत नोकरीसाठीच्या मुलाखतीसाठी गेलेला असता. मुलाखत घेणारी व्यक्ती तुमचा मित्र किंवा ओळखीतली निघते. अशा व्यक्तींशी बोलताना तुम्ही हातचं राखून बोलता. कारण तुमचा आत्मविश्वास कमी झालेला असतो.

### मदत करणाऱ्याची तक्रार

आत्मविश्वास कमी असलेल्या व्यक्तींच्या मदतीसाठी अनेक जण धावून आल्याची उदाहरणं आपण पाहिली आहेत. पण काही मंडळी मदत करणाऱ्यांची तक्रार करण्यात वेळ घालवतात. असं न करता प्रत्येक गोष्टीची चांगली बाजू बघता आली पाहिजे.

- स्वतःला दोष देणं : मानसिकदृष्ट्या सक्षम असलेली मंडळी कोणतंही काम पूर्ण जबाबदारीनं स्वीकारतात. अपयश ही यशाची पहिली पायरी असते, असं म्हटलं जातं. त्यामुळे अपयश आलं तर काही व्यक्ती उगाच स्वतःला दोष देत बसत नाहीत. तसं करणं त्यांच्या लेखी निरुपयोगी आणि आत्मविश्वास कमी करणारं असतं. वेळोवेळी स्वतःला माफ करून किंवा मनाची समजूत काढून पुढे कसं जाता येईल याचा विचार करतात.
- नकारात्मक विचार करणं : माझ्यासोबत किती वाईट झालं, याचा विचार करणारी अनेक मंडळी आपल्या अवतीभोवती असतात. आपल्यावर संकट ओढवण्याची किंवा वाईट प्रसंगाना सामोरं जाण्याची भीती अनेकांना सतावत असते. असा नकारात्मक विचारांचा मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. संकटाला कशा प्रकारे सामोरं जाता येईल याचा विचार करायला हवा.
- भूतकाळाचा विचार करणं : सर्वात नकारात्मक आणि आत्मविश्वास कमी करणारी गोष्टी म्हणजे भूतकाळाचा विचार करणं. गत जीवनात घडलेल्या नकारात्मक गोष्टींचा आणि झालेल्या चुकांचा विचार करत बसणारी अनेक मंडळी आहेत. अशा व्यक्ती मानसिकदृष्ट्या अशक्त असतात. यामुळे मनात वाईट आणि नकारात्मक विचार घोळत राहतात. आत्मविश्वास वाढवायचा असेल तर असं करणं प्रकर्षानं टाळलं पाहिजे. भूतकाळाचा जास्त विचार न करता भविष्याचा विचार केला पाहिजे.

## आत्मविश्वास जागविताना...

**तुम्हाला स्पष्ट मत खरच देता येते? मला हे जमत नाही म्हणत कायम मागे-मागे राहायचे. इतके की कुणी तुमची दखलच घेत नाही. मी हे करू शकते, असे आत्मविश्वासाने सांगता येत का? आत्मविश्वास हाच तर तो शब्द आहे. सगळे येते, पण बोलण्याचे धाडस नाही. कारण आत्मविश्वास नाही. हा आत्मविश्वास कुठे मिळत नसतो, तर तो स्वतःजवळच असतो आणि त्यालाच बाहेर काढण्याचे काम रश्मी मनसबदार-गुज्जर करतात. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मोटिव्हेशलन स्पीकर व लाइफस्कील कोच रश्मी यश मिळविण्याचे तंत्र शिकवतात. मूळ औरंगाबादकर रश्मी सध्या कॅलिफोर्नियामध्ये वास्तव्यास असून, कॉन्फिडनस कोचिंग टू यू या कंपनीच्या संस्थापक आहेत. औद्योगिक क्षेत्रापासून विद्यार्थी व अगदी सामान्य माणसालाही मार्गदर्शन करणाऱ्या रश्मी यांनी त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर केले आहेत.**




निर्णय घेण्याची क्षमता तुमच्यात असल्याने तुमच्या समस्यांमधून बाहेर पडता येते. खासगी आयुष्य आणि करिअर यातील समतोल साधता येतो. आवश्यकता आहे ती स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मविश्वासाने जीवन जगण्याची आणि जीवनकौशल्यांना योग्य दिशा देण्याची. प्रत्येकाला आत्मविश्वासाचे धडे देण्याची माझी धडपड असते व तेच माझे काम आहे, असे रश्मी मनसबदार-गुज्जर सांगतात. मी विकसित केलेले तंत्र अगोदर स्वतः उपयोगात आणले. मी स्वतःही अनेकदा अडचणीत सापडले होते. मदतीची गरज मलाही होती, पण कोणत्याही परिस्थितीत स्वतःवरील आत्मविश्वास गमाविला नाही. जे करायचे ते आत्मविश्वासाने व हेच मी आज दुसऱ्यांना शिकविते, असे रश्मी सांगतात. याची सुरुवात लहानपणाच झाली होती. वडील शशीकुमार मनसबदार व्यावसायिक, तर आई कमलेश शिक्षक. मोठा भाऊ शिशीर व मला वाढवतानी आई-बाबांनी संस्कार तर दिलेच, पण तू मुलगी आहेस म्हणून हे कर, ते नको करू, असे अजिबात शिकविले नाही. त्यामुळे मला जे आवडायचे मी तेच करायचे. वडिलांच्या व्यक्तिमत्वाचा थेट परिणाम व्हायचा. त्यांची संवाद साधण्याची कला, पटवून देण्याचे कसब पाहून आपणही असेच काही करायचे, असे वाटायचे. एक गोष्ट ते कायम सांगायचे. जे करायचे ते कर, पण स्वतःच्या हिमतीवर. असाच एक प्रसंग आठवीत असताना घडला. शाळा, अभ्यास सांभाळून भरतनाट्यमच्या वर्गाकरता मला सिटीबसने जावे लागायचे. रोजच्या या त्रासाला मी फार कंटाळले होते. बाबांकडे सायकलचा आग्रह धरला, तर ते म्हणाले, सायकल हवी आहे ना मग ती तुझ्या हिमतीवर घे. पैठण गेटवर बँक ऑफ बडोदाची शाखा आहे तिथे जा आणि अमूक माणसाला भेट. ती व्यक्ती तिथली शाखा व्यवस्थापक होती. मी बँकेत गेले आणि सायकल मला किती गरजेची आहे, हे त्यांना पटवून दिले. माझी जिद्द पाहून त्यांनी माझी सर्वांशी ओळख करून दिली आणि सांगितले, आपल्या शाखेच्या सर्वात लहान कर्जदाराला लवकर कर्ज द्या. या प्रसंगातून एक लक्षात आले की, जगात अशक्य असे काहीच नसते. केवळ प्रश्न विचारायची तयारी असावी. लहान वयातच आलेला हा स्वावलंबीपणा मी नंतरही जोपासला, असे त्यांनी सांगितले. होलिक्रॉस शाळेत दहावीपर्यंतचे शिक्षण, देवगिरी कॉलेजमधून बारावी पूर्ण करतानी मी एनसीसीमध्ये सहभागी झाले. त्यामुळे मला कमालीची शिस्त लागली होती. एनसीसीचे २७ कॅम्प पूर्ण केले असल्याने आपण डिफेन्समध्ये जायचे किंवा आयपीएस व्हावे, असे ठरवून टाकले, पण इंजिनीअरिंगमध्ये काही जागा एनसीसीच्या कोट्यासाठी राखीव असतात व याचा पुढे फायदा होईल म्हणून काहीशा अनिच्छेनेच गव्हर्मेंट कॉलेजमधून बी. ई. झाले. व्यवस्थापन शाखेची आवड असल्याने पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एमबीएला प्रवेश घेतला. यादरम्यान डिफेन्स मागे राहिले आणि रश्मी व्यवस्थापनामध्ये रुळल्या.


### तुझ्या हिमतीवर कर...



जे करायचे ते तुझ्या हिमतीवर कर, ही वडिलांची शिकवण असल्याने सकाळी एमआयटी कॉलेजमध्ये शिकवायला जाणे, दुपारी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचे क्लास घेणे आणि संध्याकाळी एमबीएचा वर्ग करणे, असा रश्मी यांचा दिनक्रम होता. एमबीएच्या दुसऱ्या वर्षी फार्मास्युटिकल सेल्समन मनिष गुज्जर यांच्यासोबत विवाह झाला व नंतर त्या कॅलिफोर्नियाला स्थायिक झाल्या. 'परदेशात पाऊल टाकताच तुम्हाला एकदम हतबल झाल्यासारखे वाटते. सुरुवातीचे काही दिवस माझ्यासोबतही असेच झाले. आपले माणूस म्हणून कुणी बोलायला नाही. लोक मदत करायची, पण तेथील जीवन खूप वेगळे असते. मुलांना एकटे सोडून बाहेर जाता येत नाही. तेथे काम, घर सांभाळा हे सगळे सोपे नसते,' असे रश्मी सांगतात, पण उशिरा का होईना सुरुवात झाली आणि त्यांनी ओरॅकल कार्पोरेशन, कॉम्पॅक, एचपी अशा काही कंपन्यांत काम केले. यादरम्यान मला सतत जाणवायचे की, या क्षेत्रात प्रत्येकाला अडचणी आहेत. कॉर्पोरेट आयुष्य चकाकणारे भासते, पण प्रत्येक व्यक्ती भरडली जातो. हळूहळू रश्मी यांनी सहकाऱ्यांसाठी क्लास घेणे सुरू केले. वीकेंडला रश्मींच्या घरीच वर्ग चालायचे. तेव्हा जॉब आणि घर सांभाळून त्या क्लास घ्यायच्या. आता मात्र लक्ष्य स्पष्ट होते की, पुढे याच क्षेत्रात स्थिर व्हायचे.

### संधी मिळते ते करा...

रश्मी सांगतात की, एनसीसीमध्ये एक गोष्ट शिकविली जाते. तुम्ही एक साधे सैनिक असला तरी लढाईत तुम्ही तितकेच महत्त्वाचे असता. त्यामुळे जे करण्याची संधी मिळते ते करा. मी कॅलिफोर्नियाला होते. माझा जॉब, कुटुंब सगळ ओके होते, पण मला वाटायचे की, आपण एक स्पीकर म्हणून याही वयात करिअर करू शकतो. कॉन्फिडन्स कोचिंग टू यू कंपनी स्थापन केली. या कंपनीअंतर्गत मोटिव्हेशनल स्पीकर व लाइफ-स्कील कोच ट्रेनिंग रश्मी देतात. यामध्ये विद्यार्थी, कार्पोरेटसह गृहिणीही आहेत. येथील नागरिक शिक्षणामध्ये पैसे गुंतवतात. साठ वर्षांचे आजी-आजोबाही शिकण्यासाठी उत्सुक असतात. स्वतःमधली उणीव ते मान्यही करतात आणि कुणाकडूनही शिकण्यासाठी तयार असतात. मूल्यांचे शिक्षण संपूर्ण आयुष्य बदलून टाकते. ही मूल्ये प्रत्येकालाचा आवश्यक आहेत. लाइफ स्कील कोच म्हणून मी डिफाइन, डिझाइन व डिप्लॉय या त्रिसूत्रीवर आधारित मॉडेल विकसित केले आणि या आधारे त्यांना शिकविते, असे रश्मी सांगतात. अचिव्ह यूअर ड्रीम विथ इज सारख्या पुस्तकाच्या लेखक असलेल्या रश्मी जीवनकौशल्ये शिक्षण देण्यासाठी कायम भ्रमंतीवर असतात. माझी कंपनी मला प्रॉफिट देत नाही, पण वयाच्या ४१व्या वर्षी रिटायर्डमेंट घेतल्यानंतर मी जेथे संधी मिळाली तेथे माझ्या क्लायंटचे आयुष्य बदलले व त्याचा मला अभिमान आहे. या अनुषंगानेच वर्षातून एकदा भारतात येते व कार्यशाळा घेते, असे रश्मी नमूद करतात.



## शॉर्ट न्यूज

### फसवणूक करणाऱ्या गुन्हेगाराला अटक करा

**जामखेड :** येथील सौरव कदम यांच्याकडून नोकरी लावण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन अण्णा सावंत यांने फसवणूक केली होती. झालेल्या फसवणुकीचा जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ केली जात होती. यासाठी कदम कुटुंबाला सावंत याच्यावर गुन्हा दाखल करावा म्हणून यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयावर कुटुंबासहित उपोषणास बसावे लागले होते. याची दखल घेत पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशावरून जामखेड पोलीस स्टेशनमध्ये अण्णा सावंत याच्यावर २५ जून २०२४ रोजी गुन्हा फसवणुकीचा दाखल झाला होता.

### विहिरीत पडून चिमुकल्याचा मृत्यू

**श्रीगोंदा :** देवदैठण येथील लोखंडे वस्ती येथील एका सहा वर्षीय चिमुकल्याचा घरासमोर खेळत असताना विहिरीत पडून मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि. २२) घडली. आर्यन सुनील लोखंडे असे मृत मुलाचे नाव आहे. आर्यन हा घरासमोर खेळत होता. त्यांच्या घरासमोरच एक विहीर आहे. तो खेळत असताना विहिरीत पडला असावा, असा अंदाज आहे. बराचवेळ झाले तरी आर्यन दिसत नसल्याने त्याची आई अश्विनी लोखंडे यांनी वस्तीवरील सर्वांना सांगितले. त्यानंतर सर्वांनी परिसरामध्ये पाहणी केली.

### कृषी कौशल्यातून प्रगतीची संधी

**संगमनेर :** आपला देश कृषिप्रधान असल्याने कृषी पदवीधरांना या क्षेत्रामध्ये अमर्याद संधी उपलब्ध आहेत. केवळ नोकरीसाठी शिक्षण न घेता मिळविलेल्या कौशल्याच्या आधारे व्यवसाय अथवा उद्योग उभारून प्रगती करण्याची संधी कृषी पदवीधरांना आहे, असे श्रीरामपूर येथील प्रा. ऋषिकेश औताडे म्हणाले. रविवारी (दि. २२) डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन कृषी महाविद्यालयात प्रवेशित प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

### लज्जास्पद वर्तन करत दिली धमकी

**नगर :** युवतीचा पाठलाग करून तिच्याशी लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणाऱ्या तरूणाविरूध्द येथील कोतवाली पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. साहील बलभीम सोनटक्के असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे. उपनगरात राहणाऱ्या पीडिताने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. २२ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास युवती क्लासवरून घरी जात असताना साहीलने तिला रस्त्यात अडविले. तु माझ्याशी बोलत का नाही, माझा फोन का उचलत नाही, मला तुझ्याशी लग्न करायचे आहे असे म्हणून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले.

### नागरिकांना वाढीव वीज बिलांचे हप्ते करून द्या

**श्रीरामपूर :** भरमसाठ वाढलेली विज दरवाढ आणि दर महिन्याला येणारी बाढीव बिले सामान्य नागरिकांना भरणे जिकिरीचे झाले असून ज्यांना हवे त्यांना या पेमेंटचे हप्ते करून द्यावे, अशा मागणीचे निवेदन महावितरणच्या अधिकाऱ्यांना श्रीरामपूर भाजपाच्या बतीने देण्यात आले. गेल्या कित्येक महिन्यांपासून महावितरणचे वाढीव बिले नागरिकांना येत आहेत. या वाढीव बिलांच्या तक्रारींची कोणीही दखल घेत नाही. वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात कोणी तक्रार घेवून गेल्या त्याच्याकडे कानाडोळा केला जातो. थातूरमातूर उत्तरे देवून परत पाठविले जाते.

# शंभर वर्षांनंतर शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळणार

## महसूल मंत्री विखे पाटलांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : प्रतिनिधी**

**सुमारे १०० वर्षांपासून प्रलंबित असलेला हरेगाव मळ्यातील जमिनीचा प्रश्न महसूल मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याचा मार्ग मोकळा झाला. सोमवारी झालेल्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यामुळे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून शेतकऱ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे.**

हरेगाव मळ्यातील जमिनी मूळ मालकांना परत देण्याबाबत महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रस्ताव सादर केला. त्यानुसार मंत्रिमंडळाने या सुधारित कायद्याला मान्यता दिली. या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांचा फायदा होणार असल्याने मंत्री विखे पाटील यांनी राज्य सरकारचे आभार व्यक्त केले. सन १९१८ साली तत्कालिन नेवासे तालुक्यातील तीन गावे व कोपरगाव तालुक्यातील सहा गावे, अशा आजच्या श्रीरामपूर तालुक्यातील नऊ गावांच्या जमिनी ब्रिटिश सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणानुसार सन १९२० मधे ७३७७ एकर जमीन बेलापूर कंपनीला साखर कारखान्यासाठी ९९ वर्षांच्याा कराराने दिलेली होती. सन १९३४ साली या गावातील ताब्यात घेतलेल्या क्षेत्राला महसुली गावाचा दर्जा देऊन ब्रिटिश सरकारने त्याला हरेगाव असे नाव दिले.



स्वातंत्र्यानंतर सन १९६१ साली आलेल्या सिलींग कायद्यानुसार बागायत क्षेत्रासाठी १८ एकर, हंगामी बागायतसाठी ३६ एकर व जिरायत क्षेत्रासाठी ५४ एकर अशी कमाल जमीन धारणा ठरविण्यात आली. यावेळी राज्यभरातील १३ खाजगी साखर कारखान्यांच्या ताब्यातील एकूण ८५००० एकर जमिनी अतिरिक्त ठरल्याने ह्या सर्व जमिनी शासनाकडे हस्तांतरित करण्यात आल्या. या जमिनीचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन १९६३ मध्ये शेती महामंडळाची स्थापना केली. यावेळी असंख्य शेतकऱ्यांच्या खंडाने हजारो एकर जमिनी शेती महामंडळाच्या ताब्यात आल्या. यामुळे या जमिनी परत मिळविण्यासाठी खंडकरी शेतकऱ्यांचा मोठा संघर्ष उभा राहिला. त्यामुळे शासानाने २०१२ मध्ये सिलींग कायद्यात सुधारणा करून खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याचा निर्णय घेतला. त्यातही महसूल मंत्री विखे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. महसूल मंत्री विखे पाटील यांनी आपल्या कार्यकाळात खंडकऱ्यांच्या जमिनी विनामुल्य त्यांच्या नावावर करून हजारो खंडकरी शेतकऱ्यांना दिलासा दिला. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांना शेती महामंडळाच्या जमिनी उपलब्ध करून देण्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील भूमिहीन नागरिकांना घरासाठी हक्काच्या जागा मिळाल्या.

**मंत्रिमंडळाचा निर्णय**

सन २०१२ मध्ये खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत दिल्या असल्या तरी हरेगाव मळ्यातील जमिनी या बेलापूर कंपनीला करारावर दिल्या असल्याने वेळोवेळी या शेतकऱ्यांचे प्रस्ताव शासनाकडून फेटाळण्यात आले होते. परंतु, विखे पाटील यांनी महसूलमंत्री पदाची धुरा सांभळत असताना या विषयाचा सखोल अभ्यास केला. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत त्यांनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा केला. हरेगाव मळ्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी त्यांनी विधी विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेऊन याबाबत कायदेशीर मार्ग काढण्याचे निर्देश दिले. कायद्यात स्वतंत्र सुधारणा करून या जमिनी वाटप करता येऊ शकतात, असा निष्कर्ष निघाला असता, याबाबत उच्च न्यायालयाला माहिती देण्यात आली. उच्च न्यायालयाने सुधारणेला सहमती दिल्यानंतर पुन्हा प्रस्ताव महाधिवक्ता यांना पाठविण्यात आला. महाधिवक्ता यांनी कायद्यात सुधारणा करण्यास शासनाला बंधन नसल्याचे अभिप्राय दिल्यानंतर ही सुधारणा मंत्रिमंडळासमोर मांडण्यात आली. आज सोमवारी त्याला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली. महसूल मंत्री विखे पाटील यांनी शेतकऱ्यांना १०० वर्षांपेक्षा अधिक कालावधीनंतर शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. हरेगाव मळ्यातील शेतकऱ्यांना जमीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शेतकरी आनंदीत झाले असून, महसूल मंत्र्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

**जमिनी वाटपाबाबत लवकरच सुरूवात : मंत्री विखे पाटील**

''हरेगाव मळ्यातील जमिनी मूळ मालकांना परत देण्याबाबत कायद्यातील सुधारणेला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता मिळाली. आज झालेल्या निर्णयाला आता राज्यपालांची मान्यता मिळाल्यानंतर या जमीनी परत करण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करून, जमीन वाटपास सुरुवात करण्यात येईल. अनेक वर्षे चाललेल्या शेतकऱ्यांच्या या संघर्षाला मला न्याय मिळवून देण्यामध्ये योगदान देता आले याचे मला समाधान आहे,'' असे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

# ...तर मुंबईचं पाणी बंद करू !

## आमदार किरण लहामटेंचा इशारा

**अकोले : प्रतिनिधी**

**शासनाने धनगर समाजाला आदिवासी कोट्यातून आरक्षण देण्याच्या संदर्भात पाऊल उचलले, तर मुंबईचे पाणी बंद करू, असा थेट इशारा आमदार किरण लहामटे यांनी दिला. त्यांच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहे.**

धनगर आरक्षणासाठीचा जीआर काढला, तर आम्ही सर्व आदिवासी समाजातील आमदार आणि खासदार आक्रमक पवित्रा घेऊ ,अशी भूमिका त्यांनी मांडली. आत्तापर्यंत आदिवासांनी एवढा त्याग केला आहे, जर तुम्ही आमच्या आरक्षणावर गदा आणताल, तर आम्ही मुंबईचं पाणी बंद करू, तिथे जोडणारे जे रस्ते आहेत ते थांबवू, असा थेट इशारा लहामटे यांनी दिला. मुळात धनगर समाजाला आदिवासी कोट्यातून आरक्षण देण्याच्या संदर्भातील निर्णय हा केंद्राचा आहे. धनगर समाजातील नेत्यांनी सुद्धा आम्हाला वेगळं आरक्षण द्या, अशी मागणी केली आहे, त्यामुळे सरकारने असे करू नये,



असेही लहामटे यांनी सांगितले.

# कॉलेज रोडवर पिस्तुलाचा थरार ; पण छऱ्याच्या !

## पोलिसांच्या तपासणीत प्रकार उघड

**पारनेर : प्रतिनिधी**

**महाविद्यालय परिसरात तरुणींची छेडछाड काढणे वेगात दुचाकी पळविणे अशा घटना वारंवार घडत असतात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून महाविद्यालयीन तरुणांची सत्यता पडताळण्यासाठी तपासणी करण्यात येते अशीच तपासणी आज मंगळवारी सुरू असताना दोन दुचाकीस्वार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे कमरेला छऱ्याचा पिस्तूल आढळून आल्याने खळबळ उडाली आहे**



या संदर्भातील माहिती अशी की महाविद्यालय परिसर व रस्त्यामध्ये महाविद्यालयीन युवतींची छेडछाड करण्याचे प्रकार घडू नये यासाठी या परिसरातील विद्यार्थी हे महाविद्यालयीन विद्यार्थीच आहेत का याची तपासणी पोलिसांकडून नेहमीच करण्यात येते अशीच तपासणी आज सुरू असताना दोन दुचाकीस्वारांना पोलिसांनी अडविल्यानंतर त्यांनी पोलिसांना दाद न देता निघून जाण्याचा प्रयत्न केला पोलिसांनी त्यांना अडविल्यानंतर त्यांची झडती घेतली यावेळी या झडतीत एका युवकाकडे छऱ्याचा पिस्तूल आढळून आला.

या विद्यार्थ्यांची खात्री केली असता हे दोघेही महाविद्यालयीन विद्यार्थी असल्याचे समजले. या विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांना बोलावून हा घडलेला प्रकार सांगितला व त्यांच्या भवितव्याचा विचार करून सामंजस्याची भूमिका घेत समज देवून सोडून दिले. मात्र महाविद्यालय परिसरात महाविद्यालय विद्यार्थ्यांकडेच छऱ्याचा पिस्तुल आढळल्याने खळबळ उडाली आहे.या विद्यार्थ्यांनी हा छऱ्याचा पिस्तुल कशासाठी आणला होता याची माहिती मिळू शकली नाही मात्र इतरांवर प्रभाव पडण्यासाठी यांनी हा पिस्तुल आणल्याचे समजते.

(पान १ वरून)

### काळू धरण ओव्हर फ्लो ! शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण

त्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

**दृष्टीक्षेपात काळू (मध्यम ) लघु पाटबंधारे तलाव**

नदी-काळू

एकूण पाणीसाठा- २८९. दशलक्ष घनफूट.

जिवंत पाणीसाठा- १०० दश लक्ष घनफूट.

मृतसाठा- १०० दशलक्ष घनफूट.

एकूण लाभक्षेत्र-२०१७ हेक्टर.

लाभक्षेत्रातील गावे - ढवळपुरी व धोत्रे.

प्रकल्प उभारणीचा खर्च-२३ कोटी ४४ लाख.

**पाणीप्रश्न सुटणार** ढवळपुरी व भाळवणीसारख्या मोठ्या लोकसंख्यांच्या गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना काळु प्रकल्पामधूनच आहेत. उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी पाण्याची अडचण येत होती. मात्र यंदा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्याने किमान दोन वर्ष पाण्याची अडचण येणार नाही.

नंदाताई गावडे, सरपंच ढवळपुरी

### भाजपाची उमेदवारी निष्ठावंतालाच !

जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे मा. सभापती काशिनाथ दाते, भाजपाच्या सांस्कृतीक सेलचे जिल्हाध्यक्ष कृष्णाजी बडवे, खरेदी विक्री संघाचे संचालक बाजीराव अलभर, जिल्हा कार्यकारणी सदस्य नवनाथ सालके, तालुका उपाध्यक्ष सोनाली सालके, ज्ञानदेव पठारे, संतोष सालके, गणेश देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

**मी उमेदवारी करावी हा जनतेचा आग्रह**

माझ्याकडे कुठल्याही प्रकारचे घटनात्मक पद नसताना केवळ संघटनात्मक पदाच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात अब्जावधी रूपयांची धोरणात्मक विकास कामे मार्गी लावल्याचे लोक पाहत आहेत. त्या निमित्ताने जनतेच्या घरामध्ये विश्वासाचे घर निर्माण करता आले हे मी माझे भाग्य समजतो. आज तालुक्यात कुणीही उठसुट स्वतःच्या उमेदवारीची मागणी करत असून मी भाजपाची विधानसभेची उमेदवारी करावी हा सर्वसामान्य जनतेचा आग्रहच माझा विश्वास वृध्दींगत करत आहे.

**चुकून निर्णय झाल्यास ..**

भाजपाचे कार्यकर्ते तसेच भाजपाला माणाऱ्या नागरीकांच्या भावनांची पक्षाच्या नेतृत्वाला जाणीव आहे. पक्षश्रेष्ठी पक्षहिताचा निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाहीत. चुकून आपल्या भावनांची पायमल्ली करणारा निर्णय झाल्यास जे तुमच्या मनात तेच माइ-या ध्यानात असल्याचे सांगत उमेदवारी देताना डावलले गेल्यास आपण दुसरा निर्णय घेण्यास तयार असल्याचेही कोरडे यांनी अप्रत्यक्षपणे सुचित केले.

### नगर शहरातील सीना नदीला पूर

हजेरी झाली नगर शहरातील नगर- कल्याण रस्त्यावरील सीना नदी दुथडी भरून वाहत होती.या पावसाळ्यात दुसऱ्यांदा सीना नदीला पूर आलेला आहे .महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान् कल्याण महामार्गावरील, बोल्हेगाव रस्त्यावरील सीना नदीचा पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक सुमारे पाच तास ठप्प झाली होती. मंगळवारी सकाळी यावरून जाण्याचा प्रयत्न करणारी वाहने अडकून पडली होती. शहर तसेच उपनगरातील काही घरात पाणी घुसल्याने नागरिकांचे हाल झाले.






# अन्वर शेख, अश्विनी आवारी राष्ट्रवादीचे पदाधिकारी

## रांधे येथील पक्ष संघटनेला खा. लंके यांच्याकडून बळकटी



**रांधे : प्रतिनिधी**

**रांधे येथील अन्वर शेख यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलच्या तालुका उपाध्यक्षपदी तर रांध्याच्या विद्यमान उपसरपंच अश्विनी आवारी राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. खा. नीलेश लंके यांच्या सुचनेनुसार अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष नुर कुरेशी व महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुवर्णा धाडगे यांनी ही नियुक्तीपत्रे दिली.**

लोकसभा निवडणूकीतील कामगिरीची दखल घेत रांधे गावातील राष्ट्रवादी काँग्रेस तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानला ताकद देण्यासाठी खा. नीलेश लंके यांनी पुढाकार घेतला आहे. महिनाभरापूर्वी प्रतिष्ठाणच्या उपाध्यक्षपदी अनिल आवारी यांची निवड करण्यात आली होती.

अन्वर शेख व अश्विनी आवारी यांच्या निवडीबद्दल खा. नीलेश लंके, जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सुवर्णा धाडगे, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष नुर कुरेशी, बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### विश्वास सार्थ ठरवू

**खा. नीलेश लंके आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुका संघटनेने आपल्यावर दाखविलेल्या विश्वासास पात्र राहून येणाऱ्या काळात सर्व घटकांना सोबत घेऊन संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार आहोत.**

**अन्वर शेख**
तालुका उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेल

### महिलांचे सक्षमीकरण करणार

**आमच्या नेत्या राणीताई लंके तसेच पक्षाच्या तालुकाध्यक्षा सुवर्णाताई धाडगे यांच्या नेतृत्वाखाली महिलांचे संघटन करून महिलांना सक्षम करण्यासाठी पदाचा वापर करणार आहोत.**

**अश्विनी आवारी**
तालुका सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी

# आंतरराष्ट्रीय परिषदेत न्यू इंग्लिश स्कुलला दुसरा क्रमांक

## निघोजच्या न्यू इंग्लिश मिडियम स्कुलचे यश

**निघोज : प्रतिनिधी**

**मुंबई येथे शनिवार (दि.२१) सप्टेंबर रोजी पार पडलेल्या विज्ञान आंतरराष्ट्रीय परीषदेत बाबासाहेब कवाद न्यू इंग्लिश मिडियम स्कुलने दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस पटकावत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत न्यू इंग्लिश मिडियम स्कुलचे नववी व दहावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विज्ञान क्षेत्रात विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सोनाली खन्ना या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होत्या. उमेश रूस्तोगी, छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे सल्लागार शिवप्रसाद खेड आददी मान्यवर यावेळी उपस्थित होते.




यशस्वी विद्यार्थ्यांना विज्ञान आंतरराष्ट्रीय परिषदेचे प्रा. डॉ. अरूण सावंत, प्रा. उल्हास ओझ, दीपक श्रीवास्तव यांच्या हस्ते दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस देण्यात येऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. या विद्यार्थ्यांना प्रा. युवराज गायकवाड, सविता मोरे, मनिषा एरंडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

### पॉवर पॉईट प्रेझेंटेशन

**या परिषदेत तन्मय औटी, प्रांजल होले व कस्तुरी आढाव या विद्यार्थ्यांनी पावर पॉईट प्रेझेंटेशन सादर केले. त्याचे परिषदेत सहभागी झालेल्या विज्ञान क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी कौतुक केले. त्यास परिषदेतील दुसरा क्रमांक बहाल करून गौरविण्यात आले.**

यशस्वी विद्यार्थ्यांने न्यू इंग्लिश मिडियम स्कुलचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद, प्राचार्य सल्वादर डायस, व्यवस्थापन प्रतिनिधी संगिता कवाद, यांच्यासह निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाचे विश्वस्त, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

# सुरळीत वीज पुरवठ्यासाठी ठिय्या आंदोलनाचा इशारा

## वीजेच्या लपंडावाला पारनेरकर वैतागले

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरासह तालुक्याच्या विविध भागात सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या मागणीसाठी येत्या ३० सप्टेंबर रोजी वीज वितरण कंपनीमध्ये ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा पारनेर शहरातील नागरीकांनी दिला आहे.**

यासंदर्भात वीज वितरण कंपनीच्या सुव्यवस्था व संचालनाचे उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, गेल्या काही दिवसांपासून पारनेर शहरासह तालुक्याच्या विविध गावांमधील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. वीज पुरवठयाच्या लहरीपणामुळे नागरीकांना मोठया प्रमाणावर मनस्ताप सहन करावा



लागत आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो. यासंदर्भात वारंवार मागणी करूनही वीज वितरणामध्ये सुसुत्रता येत नाही. दररोज खंडीत होणार वीज पुरवठा ही नित्याचीच बाब बनली असून नियमित वीज बिले भरूनही वीज ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे.

अखंडीत व पुर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यात यावा व त्यासाठी योग्य ती पाऊले उचलावीत अशी विनंती या निवेदनात करण्यात आली असून निवेदनाची दखल न घेतली गेल्यास सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

ज्येष्ठ नेते रा.या.औटी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष बाळासाहेब शेटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर समन्वयक सचिन नगरे, राजेश चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष वैभव गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट घेउन संबंधित निवेदन सादर केले.

# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत किसानचा बोलबाला

## विविध क्रीडा प्रकारांत यश

**पारनेर : प्रतिनिधी**

**जिल्हा क्रीडा कार्यालय व न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच संयुक्त विद्यामाने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत शहरातील किसान इंटरनॅशनल स्कुलचा बोलबाला दिसून आला. विविध स्पर्धांमध्ये स्कुलच्या खेळाडूंनी प्रथम, व्दितीय क्रमांक पटकावत ते जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.**

तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष बापूराव होळकर व इतर क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेवर किसानच्या खेळाडूंनी छाप सोडली. किसानचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्यासह तालुका क्रिडा समितीचे अध्यक्ष बापूराव होळकर, किसानचे प्राचार्य राठोर, क्रीडा शिक्षक ऋषीकेश औटी यांच्यासह किसान स्कुलच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.




### यशस्वी विद्यार्थी

**किसान स्कुलचे विशाल राय, कृष्णा दुधाडे, आर्यन कर्डिले, बाळकृष्ण औटी, वैष्णव चेडे, साई खोसे, आर्यन रोकडे, ईश्वर कापसे, पृथ्वीराज गजले, सार्थक रेपाळे, अर्णव झंजाड, अखंड मिसाळ, प्रज्वल औटी, तन्मय औटी, सुरज भागवत यांनी उत्कृष्ट खेळ करत रिले रनिंग, गोळा फेक, लांब उडी, भाला फेक, हाईल्स या स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी प्रथम व व्दितीय क्रमांक पटविले.**

### किसानचा अभिमान

**सर्व यशस्वी खेळाडूंचा किसानचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय स्पर्धे साठी शुभेच्छा देत शारीरीक संपत्ती ही सर्वात मोठी संपत्ती असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभागी झाले पाहिजे. किसान स्कुलमध्ये विद्यार्थ्यांकडून दररोज रनिंगचा सराव रून घेण्यात येत असून विद्यार्थ्यांमध्ये क्षमता निर्माण झाल्यामुळेचे हे यश संपादन करता आल्याचे चेडे म्हणाले. जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी इतक्या मोठया संख्येने खेळाडूंची निवड होते ही स्कुलसाठी अभिमानाची गोष्ट असून जिल्हास्तरीय स्पर्धेतही स्कुलचे विद्यार्थी चकमदार कामगिरी करतील. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचेही चेडे यांनी अभिनंदन केले.**

# उच्च अधिकारी होण्यासाठी उच्च शिक्षणाची गरज

## प्रा.यश शेटे यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिपादन**

**उच्च दर्जाचे अधिकारी होण्यासाठी उच्च शिक्षणाची गरज असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मळगंगा संगणक प्रशिक्षण केंद्राचे संस्थापक अध्यक्ष प्रा.यश शेटे यांनी व्यक्त केले आहे.**

टाकळी हाजी येथील चित्रा घोडे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन पी एस आय म्हणून निवड झाल्याबद्दल मळगंगा प्रशिक्षण केंद्र. पारनेर तालुका पत्रकार संघ यांच्या वतीने यश शेटे, ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रसिद्ध कवी बबनराव सोनवणे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी सेवानिवृत्त डी वाय एस पी सुभाष सोनवणे, पी एस आय प्रियांका कवाद, लाळगे मॅडम आदी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रा. यश शेटे यावेळी म्हणाले गेली अनेक वर्षांपासून शिरूर व पारनेर तालुक्यातील विद्यार्थी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन तालुक्याचा नावलौकिक राज्यात वाढवीत आहे ही बाब अभिमानास्पद आहे. चित्रा घोडे हिने सर्वसामान्य परस्थीतीचा मुकाबला करीत शैक्षणिक परिश्रम घेऊन हे यश संपादन केले आहे. चित्रा ही अतिशय मेहनती व गुणसंपन्न विध्यार्थीनी म्हणून शाळा, महाविद्यालयात नावलौकिक मिळविला आहे. पी एस आय म्हणून देशसेवा करण्याची संधी मिळाली असून सर्वसामान्य जनतेसाठी चित्रा सेवाभाव करेल असा विश्वास शेटे यांनी व्यक्त केला आहे.

# डॉ. आंबेडकर सभागृह व प्रवेशद्वाराचे लोकार्पण

## सरपंच पंकज कारखिले यांचा पुढाकार

**राळेगणथेरपाळ : प्रतिनिधी**

**राळेगणथेरपाळमधील दलित वस्तीमधील वर्षानुवर्षांपासूनची चावडी जीर्ण झाल्याने त्या चावडीचे निर्लेखन करून त्याजागेवर ग्रामनिधी व पंधराव्या वित्त आयोगातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह तसेच प्रवेशद्वाराची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचे लोकार्पण कन्या दिनाचे औचित्य साधून महिला भगिनींच्या हस्ते करण्यात आले. सरपंच पंकज कारखिले व त्यांच्या सहकाऱ्यांनी या कामी पुढाकार घेत दलित बांधवांना सुविधा उपलब्ध करून दिली.**

यावेळी सरपंच पंकज कारखिले, उपसरपंच सारिका सोनवणे, शशिभाऊ कारखिले, पांडूरंग कारखिले, दत्तात्रेय कारखिले, सचिन कारखिले, विकास पवार, किरण कारखिले, बाजीराव कारखिले, किरण कारखिले, कैलास डोमे, बाबाजी ठुबे, राजेंद्र शितोळे, संजय कारखिले, राजू गवळी, विश्वनाथ लामखडे, युवराज अवचार, जयदीप कारखिले, महेश कारखिले, दिनेश कारखिले यांच्यासह सिध्दार्थ मित्र मंडळाचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.



### सरपंच कारखिलेंकडून न्याय

**वर्षानुवर्षीच्या या चावडीचा समाज बांधवांना विविध कार्यक्रमांसाठी, बैठकांसाठी उपयोग होत होता. मात्र अलिकडच्या काळात ही इमारत जीर्ण झाल्याने तीचा उपयोग करता येत नसे. सरपंच पंकज कारखिले यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी नव्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह उभारण्याचा निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आंमलातही आणला. सरपंच कारखिले यांनी गावामध्ये विविध विकास कामे मार्गी लावून आपल्या पदाला खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे.**

**दलित बांधवांच्या प्रतिक्रिया**

### साडेआठ लाखांत दर्जेदार काम

**एक गुंठा जागेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह व प्रवेशद्वार यासाठी केवळ साडे आठ लाख रूपये खर्चून दर्जेदार वास्तू उभ्या राहील्या आहेत. हे काम पुर्णत्वास नेणारे ठेकेदार संकेत मापारी तसेच सरपंच पंकज कारखिले यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.**

# संदेश लंके यांना मुंबई महानगरपालिकेत पदोन्नती

## प्रकल्प व नियोजन विभागाचा पदभार

**निघोज : प्रतिनिधी**



**निघोज येथील संदेश गंगाराम लंके यांना मुंबई महानगरपालिकेत सहाय्यक अभियंता या पदावर पदोन्नती मिळाली असून मुंबई महानगरपालिकेत घकव्य ( प्रकल्प ) खात्यात प्रकल्प व नियोजन विभागाचा पदभार मिळाला आहे.**

लंके हे गेली २०१२ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेत वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत होते. अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे आणि कामामाध्ये चांगल्या प्रकारे नियोजन करीत सर्वांना सामावून घेणारे अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे. अधिकारी म्हणून काम करताना जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करीत कार्यक्षमपणे काम करण्याची त्यांची पद्धत सर्वांना भावली आहे.

पारनेर तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. पदोन्नती मिळताना त्यांना मुंबई महानगरपालिकेत घकव्य प्रकल्प व नियोजन विभाग या दोन खात्याचा कारभार पाहाण्याची संधी उपलब्ध झाली आहे. हा एक त्यांचा कार्यक्षम अधिकारी म्हणून सन्मान झाला आहे. त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

पारनेर तालुका आणि त्यातही निघोज सारख्या ग्रामीण भागातील असल्याने तसेच शिक्षण जरी मुंबई येथे झाले असले तरी निघोजशी कायमचा संपर्क असल्याने आपण उच्च पदावर काम करीत असलो तरी गावाकडच्या जनतेचे प्रश्न सुटले पाहिजे ही तळमळ आहे. आणि त्याच पद्धतीने आपली काम करण्याची पद्धत असल्याने आपल्याला पदोन्नती मिळाली हा आनंद आहे. जबाबदारी वाढली असली तरी सर्वाधिक जनतेच्या संपर्कात राहून सर्वाधिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. यातच सेवाभाव असल्याचे मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकारी संदेश लंके यांनी सांगितले आहे.

# विद्यार्थी, प्राध्यापकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

## पारनेर महाविद्यालयात स्वच्छता ही सेवा मोहिम



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच विद्यार्थी विकास मंडळ यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता ही सेवा २०२४ या मोहिमेमध्ये विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी स्वच्छतेची शपथ घेतली.**

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांच्या हस्ते या मौहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यंदाच्या मोहिमेची संकल्पना स्वभाव स्वच्छता व संस्कार स्वच्छता अशी आहे.

मोहिमेच्या उदघाटनाप्रसंगी प्रास्ताविकात राष्टीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. महेश आहेर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. प्लॅस्टिक निर्मुलन करण्यासाठी जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रेय घुंगार्डे, कार्यालयीन अधिक्षक सावकार काकडे, लेखापाल रोहिणी दिघे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. रविंद्र देशमुख, शारीरीक शिक्षण संचालक डॉ. संजय गायकवाड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. डॉ. हनुमंत गायकवाड यांनी आभार मानले.

### सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता

**स्वच्छतेची शपथ घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ करून संकलीत करण्यात आलेल्या कचऱ्याचा गांडूळ खत निर्मितीसाठी उपयोग करण्यात आला. त्यानंतर पारनेर बस स्थानक, बाजारपेठ आदी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी नागरीकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देत प्लॅस्टीकचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात येऊन कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.**

### स्वच्छतेचे संस्कार रूजावेत

**विद्यार्थी दशेमध्येच स्वच्छतेच्या संस्काराची रूजवणूक होऊन राष्ट्र उभारणीमध्ये विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीमध्ये बहुमोल योगदान द्यावे, जेणेकरून सक्षम भारताची उभारणी करण्यास हातभार लागेल.**

**प्रा. डॉ. तुकाराम थोपटे**
उपप्राचार्य

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com